


## या देवी सर्वभूतेषु शक्ति-रूपेण संस्थिता।
## नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।।



# नवरात्र पर्व शक्तीचा जागर

**ज्योतिर्मय साहित्य**

पावसाळा संपण्याच्या बेतात आहे. सगळीकडे वातावरणात चैतन्य भरून राहिले आहे. शेतातील पिके काढण्यासाठी तयार झाली आहेत. अशाच सुंदर वातावरणात अश्विन शुद्ध प्रतिपदेला नवरात्रची सुरुवात होते. नवरात्री म्हणजे केवळ उत्सव नाही तर दैवी रूपातील स्त्री शक्तीची पूजा, शक्ती रूपात असलेल्या देवीची उपासना आणि अंतरातील शक्ती जागवण्याचा हा पर्वकाळ !

अश्विन शुद्ध प्रतिपदेच्या दिवशी घराघरात घट बसवला जातो. या घटस्थापनेचा संबंध हा थेट आपल्या कृषी संस्कृती आणि शेतकऱ्यांशी येतो. आपल्या शेतात जी पीकं पिकवली जातात, ज्यातून आपलं पोट भरतं त्याबद्दल श्रद्धा आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस. या काळात शेतातील पिकांची कापणी झालेली असते, घरी नवीन धान्य आलेलं असतं. घटस्थापनेला घटासमोर शेतातील माती आणली जाते. त्यामध्ये हे नवीन धान्य पेरलं जातं. एक प्रकारे हे बीज परीक्षणच असतं. दसऱ्यापर्यंत ते पीक त्या घटासमोर उगवतं. या नऊ दिवसात आदिमाया, आदिशक्तीची उपासना करताना आपल्या शेतातील धान्यांचीही पूजा केली जाते. घट हे सुजनाचे आणि मातृशक्तीचेही प्रतीक आहे.

देवघरात ठेवलेला कलश, वाजणारे शंख-घंटानाद आणि मनात जागणारा उत्साह  हे सगळं मिळून एक दिव्य, शुद्ध आणि पवित्र वातावरण तयार होतं. घटस्थापना म्हणजे केवळ धार्मिक विधी नाही; ती आपल्यातील सुप्त शक्तींना जागे करण्याची प्रक्रिया आहे. कलशातील सुपिक माती म्हणजे जणू आपल्या जीवनाची भूमी, त्यात पेरलेले बी किंवा धान्य म्हणजे आशा, श्रद्धा आणि नवी सुरुवात यांचे प्रतीक आणि अखंड दिवा म्हणजे आपल्या अंतःकरणातील विवेक आणि तेज अखंड जागृत ठेवावं यांचा संदेश देणारा मंगल दीप.


आपण महाराष्ट्रातील लोक विशेष भाग्यवान आहोत ते या अर्थाने की आपल्या महाराष्ट्रात देवीची साडेतीन शक्तीपीठे आहेत. त्या रूपात तेथे माता भगवतीचा जागृत निवास आहे. फक्त आपण त्या दृष्टीने आणि श्रद्धेने त्याकडे बघायला हवे.

जेव्हा जेव्हा पृथ्वीवर असुर उन्मत्त झाले आणि देवांनाही आवडेनासे झाले तेव्हा तेव्हा देवीने अवतार धारण करून त्या राक्षसांचा नाश केला. दुर्गादेवीने महिषासुराचा नाश केला. म्हणूनच नकारात्मक शक्ती आणि वाईट गोष्टी नष्ट होण्याच्या दृष्टीने नवरात्रातील साधना आणि उपासना अत्यंत महत्त्वाची ठरते.

कोल्हापूरची श्रीमहालक्ष्मी ऐश्वर्य, समृद्धी आणि मंगलकारकतेची अधिष्ठात्री आहे. या देवीने कोल्हासुराचा वध केला त्यामुळे या ठिकाणाला कोल्हापूर असे नाव पडले.

तुळजापूरची श्रीतुळजाभवानी पराक्रम, शौर्य आणि अन्यायाविरुद्धच्या लढाईची प्रेरणा देणारी आहे. महाराष्ट्राची ही कुलस्वामिनी मानली जाते. छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास या दोघांचीही ही कुलस्वामिनी होती हे विशेष !

तुळजाभवानी देवीच्या बाबत अशी कथा सांगितली जाते की कर्दम ऋषींची पत्नी अनुभूती ही अत्यंत पतिव्रता स्त्री होती. परंतु तिचे तप आणि पावित्र्य भंग करण्याचा प्रयत्न कुंकूर नावाच्या एका दैत्याने केला. संकटात सापडलेल्या अनुभूतीने आर्त स्वरात देवीचा धावा केला देवी पार्वती त्वरेने तिथे धावून आली आणि तिने त्या दैत्याचा संहार केला.



त्वरेने धावणारी ती त्वरजा. म्हणून ती तुळजा झाली.

माहूरची श्रीरेणुकामाता मातृत्वाची करुणामयी मूर्ती, जीवनदायिनी शक्ती आहे. माता रेणुका ही जमदग्नी ऋषींची पत्नी होती. ती अत्यंत पतिव्रता होती. ती एकदा नदीवर पाणी आणण्यासाठी गेली असताना तिने चित्ररथ गंधर्वाची जलक्रीडा पाहिली आणि तिच्या मनात आपल्या पतीसह अशाच प्रकारची जलक्रीडा करावी असा विचार आला. जमदग्नी ऋषींनी आपल्या तप:सामर्थ्याने तिच्या मनातील विचार ओळखला आणि ते अत्यंत क्रोधित झाले. त्यांनी आपल्या पुत्रांना तिचा वध करण्यास

विश्वास देशपांडे,
चाळीसगाव

सांगितले. परंतु अशा प्रकारचे कृत्य करण्यास कोणीही तयार झाले नाही शेवटी परशुरामाने आपल्या पित्याची आज्ञा शिरसावंद्य मानून माता रेणुकेचा वध केला. त्यानंतर जमदग्नी ऋषी प्रसन्न झाले आणि त्यांनी परशुरामाला वर मागून घेण्यास सांगितले. तेव्हा परशुरामाने आपल्या आईला आणि तिने भावांना जिवंत करण्यास सांगितले. नांदेड जिल्ह्यात माहूरगड येथे तिचा निवास आहे. तेथेच परशुरामांचेही एक मंदिर आहे.

वणीची श्रीसप्तशृंगी  अर्धे शक्तीपीठ मानले जाणारे, भक्तांच्या श्रद्धेचे केंद्र आहे. शृंग म्हणजे शिखर. सात शिखरांवर विराजमान असलेली म्हणून या देवीचे नाव सप्तशृंगी असे आहे. नाशिक जिल्ह्यातील वणी येथील डोंगरावर तिचा वास आहे.

महाराष्ट्रातील या साडेतीन शक्तीपीठांचे दर्शन घेण्यासाठी देशाच्या विविध कानाकोपऱ्यातून भाविक या ठिकाणी धाव घेतात आणि एक नवीन ऊर्जा, चैतन्य आपल्या सोबत घेऊन जातात.

काही वर्षांपूर्वी मी अंबाबाईच्या मंदिरात दर्शनासाठी गेलो होतो. तो अनुभव आजही माझ्या मनात ताजा आहे. पहाटेची वेळ होती. मंदिराच्या सभामंडपात टाळ-मृदुंगाचा गजर चालू होता. वातावरणात एक अद्भुत गूढता होती. गाभाऱ्यातील दिव्याच्या उजेडात महालक्ष्मीचे ते मोहक दर्शन झाले आणि अंगावर शहारे आले. घंटानाद, शंखनाद आणि पुजाऱ्याच्या मुखातून होणारे मंत्रोच्चार  जणू देवी स्वतः समोर येऊन उभी राहिली आहे असे भासत होते. त्या क्षणी वाटले, जीवनात कितीही अडचणी आल्या तरी तिचे आशीर्वाद आपल्या पाठीशी आहेत. मंदिरातून बाहेर पडलो तेव्हा मनात एक अद्भुत शांतता आणि समाधान भरून राहिले होते.

हेमाडपंथी बांधणी असलेले हे मंदिर अत्यंत प्राचीन आहे. ही देवी ऐश्वर्य देणारी असल्यामुळे तिला हिरण्यमयी महालक्ष्मी असेही म्हटले जाते. या मंदिराचे वैशिष्ट्य असे की वर्षातून दोन वेळा नैसर्गिकरित्या सूर्याचे किरण मंदिरातील मातेच्या मूर्तीवर जणू सुवर्ण किरणांचा अभिषेक करतात. मावळतीच्या सोनेरी किरणांनी उजळलेली महालक्ष्मीची मूर्ती अत्यंत मनोहर दिसते.

नवरात्र म्हणजे फक्त उत्सव नाही, तर दैवी स्त्रीशक्तीला वंदन करण्याचा काळ. देवीच्या विविध नऊ रूपांची पूजा या काळात केली जाते.

शैलपुत्री (शौर्य), ब्रह्मचारिणी (साधना), चंद्रघंटा (शांती), कूष्मांडा (सर्जनशीलता), स्कंदमाता (मातृत्व), कात्यायनी (धर्मरक्षण), कालरात्री (भीषण शक्ती), महागौरी (शुद्धता) आणि सिद्धिदात्री (पूर्णत्व व सिद्धी).

हे नऊ दिवस म्हणजे आपल्या मनातील नऊ गुणांना जागृत करण्याची संधी आहे  धैर्य, साधना, शांतता, सर्जनशीलता, करुणा, न्याय, निडरता, शुद्धता आणि पूर्णत्व.

महाराष्ट्रात नवरात्र मोठ्या भक्तिभावाने साजरे केले जाते. गावागावांत देवीचे गोंधळ होतात, जोगवा मागितला जातो, भजनी मंडळांचे भजनांचे कार्यक्रम आयोजित केले जातात, देवीच्या पुढे होमहवन, सप्तशतीचे पाठ अशा अनेक गोष्टींचे आयोजन केले जाते. एक अनोखे भक्तीचे पर्व तयार होते आणि वातावरणात एक दैवी ऊर्जा भरून राहिलेली असते म्हणूनच या काळात केलेली देवीचे उपासना अधिक फलदायी ठरते. शहरांमध्ये गरबा-दांडिया, सामूहिकपणे सर्वांनी एकत्र येऊन केलेली देवीची आरती, मिरवणुका आणि जागरण यामुळे हा उत्सव अधिक रंगतो. मात्र अलीकडे या उत्सवात ध्वनी प्रदूषण होऊ लागले आहे आणि मूळ उद्देश बाजूला पडून नको त्या गोष्टींचा शिरकाव होतो आहे.

असे म्हणतात की नवरात्रोत्सवाची लोकप्रिय परंपरा बंगालमधून संपूर्ण भारतात पसरली. बंगालमध्ये दुर्गापूजा हा एक भव्य सांस्कृतिक महोत्सव असतो. खास उभारलेल्या मंडपातील भव्य मूर्ती, ढोल वाद्यांचा गजर, विविध खेळांचे आणि उपक्रमांचे आयोजन या सर्वांमुळे तिथे नवरात्राला एक अद्वितीय रंग चढतो. अनेक लोक हा नवरात्रीचा उत्सव पाहण्यासाठी प. बंगालमध्ये गर्दी करतात. भारतात रामलीला आणि रावणदहनाने हा उत्सव रंगतो, तर गुजरातमध्ये दांडिया-गरबा नवरात्राचा आत्मा बनतो.  देशाच्या विविध भागात हा उत्सव निरनिराळ्या प्रकारे साजरा होतो.

नवरात्र हा फक्त उत्सव नाही, तर आत्मिक साधनेचा, नकारात्मकतेवर विजय मिळवण्याचा आणि अंतःकरणातील दीप प्रज्वलित करण्याचा काळ आहे. या नऊ दिवसांत आपण फुलं, नारळ, नैवेद्य अर्पण करतो, पण त्याचबरोबर आपल्या भीती, राग, मत्सर यासारख्या नकारात्मक गोष्टीही मनातून काढून टाकाव्यात. नवरात्र आपल्याला सांगते  देवी तुमच्या बाहेर नाही, ती तुमच्या आत आहे. तिला जागं करा, तिच्या साहाय्याने तुमच्या जीवनातील अंधारावर विजय मिळवा.

या नवरात्रीला घटस्थापनेच्या दिवशी एक प्रार्थना आपण सगळे आपल्या मनाशी करूया

“ हे माते, आमच्या जीवनात तेज, धैर्य, शांती आणि आनंद येऊ दे. आमच्यातील सुप्त शक्ती जागृत होऊ दे आणि आमच्या अंतः करणातील वाईट शक्तींशी झुंजण्याचे बळ आम्हाला मिळू दे, वाईटावर विजय मिळवण्याचं बळ दे. सर्वत्र मंगल होऊ दे.

या देवी सर्वभूतेषु शक्ति-रूपेण संस्थिता। नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।। ***

# जगदंबेची विविध रूपे

**ज्योतिर्मय साहित्य**

सोमवारपासून नवरात्राला सुरुवात होत आहे. जगतावर संकटे येतात तेव्हा त्यांच्या निवारणार्थ जगंदबेचाच धावा केला जातो. एखादे संकट तीनही देवाच्या हातून दूर होणार नसेल, एखाद्या असुराचा अंत ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांच्या हातून होत नसेल तर अखेरचा उपाय म्हणून जगदंबेचा धावा केला जातो. मग ती आई भवानी प्रकट होऊन संकटाचा नाश करते.



असुरांचा संहार करते. तिचे ते तेज:पुज रूप पाहून देवांनाही भीती वाटली. त्यावेळी त्रिदेवांनी आपापली शक्ती त्या देवीला दुर्गेला प्रदान केली, आपापली शस्त्रे तिला दिली, अशी आख्यायिका आहे. म्हणजे माता शक्तिरुपिणी आहे.

तशीच ती प्रचंड उग्र आहे. ती आदिमाया आहे. आश्विन शुध्द प्रतिपदेला ती प्रकट झाली. तिने प्रचंड अशा महिषासुराशी दहा दिवस युध्द केले. त्याला दशमीच्या दिवशी संपविले.

कधी ती चतुर्भुज असते, तर कधी अष्टभुजा तर कधी दशभुजा असते. या दहाही हातात विविध शस्त्रे  घेऊन ती युध्दाला सज्ज होते. असुरांचा संहार भक्त, देव आणि भाविकांचा सांभाळ करते. प्रत्येक दिवशी तीचे एक रूप प्रकट होते.

पहिल्या दिवशी ती माँ शैलपुत्री म्हणजे पर्वताची पुत्री. गिरीकन्या अर्थात डोंगरातील विविध जातीची ती कन्या असते. महिषासुर म्हणजे रेडा हा पर्वतरांगातून अर्निबंधपणे राहतो पर्वताची कन्या असलेली माता त्याची लपण्याची सर्व ठिकाणे जाणते. रेडाच तो. त्याने केलेला विद्ध्वंस पाहून संतप्त अशी शैलपुत्री त्या दैत्याचा नाश करते. तो गावातील सज्जनांना त्रास देतो.

प्रकाश रामचंद्र क्षीरसागर
९०११०८२२९९

जगदंबा सिंहावर बसून येते. त्या महिषासुराशी घनघोर युध्द करते. पुढे दहा दिवस विविध रूपांत ती असुरांशी लढते. देवीमाहात्म्य या ग्रंथात त्याचे मनोरम वर्णन आले आहे. महिषासुराला ती खेळखेळवत लीलया ठार करते. तरी संकट टळलेले नसते.

माँ ब्रह्मचारिणी, माँ चंद्रघंटा, माँ कुष्मांडा, माँ स्कंदमाता, मा कात्यायणी, माँ कालरात्री, माँ महागौरी, माँ सिध्दीदात्री अशा विविध रूपांत देवीने अवतार घेऊन देवांवरील संकट दूर केले. देवी प्रकट झाल्यावर तिने सर्वांना आशीर्वाद दिले. नवरात्रीच्या आरतीत देवीच्या विविध रूपांतील वर्णन केले आहे.


जगदंबेच्या आशीर्वादाने सर्व जग सुखी झाले. जगावरील संकट दूर झाले.

***

# नवरात्र उत्सव; नवचैतन्याचा उज्ज्वल प्रकाश

**ज्योतिर्मय साहित्य**

माँदेवी हे मांगल्य, चैतन्य, उर्जेचे व शक्तीचे प्रतीक आहे. अनेक कठीण प्रसंगी देवीची आराधना केली जाते. कारण माँ दुर्गेचे दुसरे रूप म्हणजे संपूर्ण ब्रम्हांडच म्हणावे लागेल. घटस्थापणेपासुन तर दसऱ्यापर्यंत संपूर्ण भारतात आपल्याला वेगवेगळ्या पध्दतीचे उत्सहाचे व मांगल्याचे वातावरण पहायला मिळते.माँ दुर्गाची शक्ती अफाट व अनंतकाल आहे. त्याची आपण गणना सुध्दा करू शकत नाही.त्यामुळे संपूर्ण शुभ कार्याप्रसंगी व कठीण प्रसंगी देवीची आराधना केली जाते.देवीचे अनेक रूप आपल्याला पहायला मिळते.प्राचीन काळापासून शक्तीच्या उपासनेला खूपच महत्व दिले आहे. शक्तीची उपासना मानवजातीच्या कल्याणासाठी नेहमी प्रेरणादायी ठरत असते. नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने आपल्याला वेगवेगळी शक्तीची रूपे पहायला मिळते. म्हणजे नवरात्रीमध्ये पृथ्वीतलावर साक्षात देवी प्रगट होत असते.या पृथ्वीतलावर देवी भागवत पुराणानुसार देवींची १०८ शक्तीपीठ असल्याचे सांगण्यात येते.त्याचप्रमाणे वेगवेगळ्या पुराणांमध्ये ही आकडेवारी वेगवेगळी सांगीतली आहे.कालिका पुराणांमध्ये  २६ ,शिवचरित्र पुराणामध्ये ५१,दुर्गा शप्तसती आणि तंत्रचूडामणिमध्ये शक्ती पीठांची संख्या ५२ सांगितली आहे. परंतु साधारणत: ५२ शक्तीपीठांना जास्त महत्व दिले जाते.या शक्ती पीठांपैकी साडेतीन शक्तिपीठे एकट्या महाराष्ट्रात आहे हे महाराष्ट्राचे अहोभाग्यच म्हणावे लागेल. देवीची साडेतीन शक्तिपीठामध्ये श्री महालक्ष्मी(अंबाबाईचे देऊळ,कोल्हापूर) हे  महाराष्ट्रात असलेल्या साडेतीन शक्तिपीठांपैकी एक आहे.श्री रेणुकामाता (माहूर) माहूर हे देवीच्या साडेतीन शक्तिपीठांपैकी दुसरे असून येथील पीठाची देवता रेणुकामाता आहे.रेणुकादेवी तसेच दत्तात्रय आणि परशुराम यांची देखील प्राचीन मंदिरे माहूरगडावर पहायला मिळते.त्यामुळे साडेतीन शक्तिपीठांपैकी हे एक मूळ जागृत पीठ आहे. तुळजाभवानी (तुळजापूर) महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी तिसरे शक्तीपीठ आहे.श्री तुळजाभवानी देवीचे तुळजापूर क्षेत्र हे एक पूर्ण शक्तिपीठ आहे.ही देवी भगवती (भवानी) म्हणून प्रसिध्द आहे. महाराष्ट्रातील प्रेरणा शक्ती व स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची आराध्य दैवत अशी ही तुळजापूरची तुळजाभवानी देवी महाराष्ट्राची कुलस्वामिनी आहे.इतिहास व पुरातत्वदृष्ट्या हे मंदिर यादवकालीन मानले जाते.तर काहिंच्या मते हे १७ व्या किंवा १८ व्या शतकातील मानली जाते.व साडेतीन



शक्तिपीठांपैकी अर्ध्या पीठाचे महत्त्वाचे स्थान म्हणजे सप्तशृंगी देवी (नाशिक) सप्तशृंगीदेवीला महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वतीचे ओंकार रूप समजण्यात येते. शुंभनिशुंभ व महिशासुर या पाशवी शक्तीच्या असुरांचा नाश केल्यावर तप-साधनेसाठी देवीने या गडावर वास्तव्य केले होते. सह्यांद्रीच्या या उंच कड्यास सात शिखरे आहेत.त्यावरूनच या स्थानाचे नाव सप्तशृंगगड असे पडले.नवरात्र उत्सवामध्ये संपूर्ण भारतात आपल्याला एक वेगळेच मांगल्याचे व नवचैतन्याचे वातावरण पहायला मिळते.कारण लहान-मोठे, आबालवृद्ध संपूर्ण मॉंदेवीच्या आराधनेमध्ये तल्लीन असतात व जय माता दी चा जयघोष करीत असतात.त्यामुळे नवरात्रीपासुनच दिवाळीच्या सणाची चाहूल लागते आणि नवरात्रीपासुनच आपण घरांच्या सजावटीला सुरूवात करतो. नवरात्र उत्सवामध्ये देवीची ९ दिवस आराधना केल्यानंतर दशमीला विजयादशमी (दसरा) उत्सव मोठ्या थाटात साजरा केला जातो.या दिवसाचे महत्त्व म्हणजे असुरी शक्तीचा नाश व सत्याचा विजय मानलेल्या जाते.दशमीला प्रभुरामचंद्राने रावणाचा संहार करून असुरी शक्तीला संपवीले व विजय प्राप्त केली. त्यानिमित्यानेच विजयादशमी उत्सव साजरा केला जातो. आपण पहातो की नवरात्रीपासुन गुलाबी थंडीला सुरुवात होते. म्हणजे संपूर्ण सृष्टीचे वातावरण या ९ दिवसांमध्ये बदलल्याचे आपल्याला दिसून येते व सर्वत्र नवचैतन्य निर्माण होते. महाराष्ट्राला संतांची भूमी संबोधल्या जाते. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात अनेक देवीदेवतांचे वास्तव्य असल्याचे आपल्याला पहायला मिळते.त्यामुळे महाराष्ट्रातील संपूर्ण नागरिकांनी महाराष्ट्र दर्शन करून देवीदेवतांचे एकदा तरी दर्शन घेतले पाहिजे.नवरात्रामध्ये आपण मॉंदेवीची आराधना करतोच यात दुमत नाही.परंतु निसर्गाला वाचविण्यासाठी देवीला साकडे सुध्दा घातले पाहिजे. कारण दिवसेंदिवस निसर्गाचे संतुलन डगमगल्याने हवामानात मोठ्या प्रमाणात बदल होत आहे. यामुळे पशुपक्षी,मानव, जीवजंतू यांचा जीव धोकादायक स्थितीमध्ये आल्याचे स्पष्ट दिसुन येते.कारण वाढते प्रदुषण, जंगल तोड यामुळे निसर्ग भयभीत झालेला आहे.याचेच प्रयचित्य पशुपक्षांना भोगावे लागत आहे. आज जंगल तोडीमुळे आणि वाढत्या प्रदूषणामुळे अनेक पशुपक्षी नामशेष झाल्याचे दिसून येते. उदाहरण द्यायचे झाले तर चित्ता असे अनेक पशुपक्षी आहेत की ते काही नामशेष झाले आहेत किंवा होण्याच्या मार्गावर आहेत.याकरिता नवरात्र उत्सव लक्षात घेता संपूर्ण भक्तांनी वृक्षलागवडीकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.फक्त फोटो शेषन पुरते

रमेश कृष्णराव लांजेवार,
नागपूर

वृक्षारोपण नसावे तर ९ दिवस वृक्षलागवडीची मोहीम युध्दपातळीवर राबवीली पाहिजे.यात सरकारचा, प्रशासनाचा, सामाजिक संस्थांचा, दुर्गा मंडळे, यांचा सुध्दा सहभाग असायला हवा.यामुळे निसर्ग प्रफुल्लित होईलच मॉंदेवी सुध्दा प्रसन्न होईल व आपणा सर्वांना भरपूर आर्शिवाद देईल.कारण वृक्षलागवडीमुळे स्थल, जल, वायु यांचे संतुलन स्थिर रहाण्यास मोठी मदत होईल.मॉं महालक्ष्मी, रेणुकामाता, तुळजाभवानी, सप्तशृंगी देवीला प्रार्थणा करतो की नवरात्रामध्ये मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड होवो आकार- पाताळ, पुर्व-पश्चिम, उत्तर -दक्षिण सर्वत्र सुख-शांती व मांगल्याचे वातावरण निर्माण झाले पाहिजे अशी देवीच्या चरणी प्रार्थना करतो.कारण नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होने काळाची गरज आहे.कारण वाढते प्रदुषण, जंगलतोड व दिवसेंदिवस ऑक्सिजनची मात्रा कमी होने.यामुळे मानव, पशुपक्षी, जीवजंतू व अन्य प्राणी यांचा सर्वांचा जीव धोक्यात आहे.याकरीता नवरात्र उत्सवाच्या पावनपर्वाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून संपूर्ण भारतवासीयांनी इतिहास घडवीने गरजेचे आहे.कारण मॉंदेवी म्हणजे संपूर्ण ब्रम्हांड त्यामुळे आपल्याला वृक्षांच्या जळामुळात, पानात,फुलात,फळात आपल्याला देवीचे अवश्य दर्शन अवश्य होईल. सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके!! शरण्ये त्र्यम्बके गौरी नारायणी नमोस्तुते!!

!! जय माता दी!!

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559